


डॉ.विशाल महादेवराव भेदुरकर

वित्त आणि लेखाधिकारी (महाराष्ट्र शासन)

संस्थापक अध्यक्ष :- ज्ञानज्योती एज्युकेशन पुणे

विद्यार्थी मित्रांनो सप्रेम नमस्कार

स्वामी विवेकानंदांनी असं म्हटलेलं आहे  कि कुठल्याही देशाचा युवक त्या देशाची सर्वात मोठी संपत्ती असते. त्या देशामध्ये जे काही रचनात्मक आणि चांगले कार्य होते त्यामध्ये त्या देशातील युवकांचा सहभाग सगळ्यात जास्त असतो. आज बेरोजगारी ही देशापुढील समस्या आहे आणि स्पर्धा परीक्षा हा युवकांसाठी यशाचा पासवर्ड झाला आहे .

स्पर्धा परीक्षेच्या क्षेत्रामध्ये मी व्यक्तिशः मागील बारा वर्षापासून कार्यरत आहे . विद्यार्थी म्हणून, शिक्षक म्हणून,  आणि त्यानंतर अधिकारी म्हणून वेगवेगळ्या नात्याने स्पर्धा परीक्षा क्षेत्राशी मागील बारा वर्षापासून माझा संबंध आहे ..

स्पर्धा परीक्षेकडे पाहण्या मागचा जो दृष्टिकोन आहे त्या दृष्टिकोनामध्येच बदल व्हावा असे मला वाटते . त्या अनुषंगाने तीन मुख्य मुद्दे आपण बघणार आहोत .

1) **<u>स्पर्धा परीक्षांकडे विद्यार्थ्यांचा पाहण्याचा दृष्टिकोन कसा असला पाहिजे</u>**

**<u>2) स्पर्धा परीक्षेच्या गैरसमजुती कश्या टाळायच्या</u>**

**<u>३) स्किल डेव्हलपमेंट आणि स्पर्धा परीक्षा .......</u>**

बहुतांश विद्यार्थ्यांना असे वाटते की **एमपीएससी यूपीएससी** म्हणजे स्पर्धा परीक्षाच होय .... .

तर विद्यार्थी मित्रांनो हा आपला खूप मोठा गैरसमज आहे एमपीएससी यूपीएससी या स्पर्धा परीक्षा आहेत पण आपल्यासाठी उपलब्ध  असलेल्या स्पर्धापरीक्षांमध्ये ह्या दोनच स्पर्धापरीक्षा आहेत.  असं अजिबात नाही आपल्याला असलेल्या **<u>अपुऱ्या ज्ञानामुळे</u>** हा गैरसमज झालेला आहे . स्पर्धापरीक्षांमध्ये एमपीएससी आणि यूपीएससी च्या परीक्षा ह्या एक प्रकारचा ग्लॅमर मिळवून आहेत हे खर आहे परंतु त्यासोबतच इतर स्पर्धा परीक्षा सुद्धा उपलब्ध आहेत पण बऱ्याच जणांना त्या माहिती नाहीत अशी परिस्थिती आहे. त्याची ओळख करून घेणे हे आत्ता आपल्या हितासाठी  गरजेचे आहे.
SSC,CAPF,RAILWAY,BANKING,आणि अशा किमान दहा परीक्षा आज उपलब्ध आहेत .

आता या ठिकाणी या लेखामध्ये मी तुम्हाला या परीक्षांविषयी कितीही सांगितलं तरी ते पुरेसे नाही किंवा हि ती जागा नाही . इथं आपल्याला त्याची मर्यादा आहे, परंतु मी तुम्हाला एक सूत्र सांगतो तुम्हाला जर या जागा पाहायचे असेल केंद्र सरकार चे **रोजगार समाचार** नावाचे जे साप्ताहिक निघते. ते साप्ताहिक न चुकता नियमितपणे वाचायला पाहिजे . आपण स्पर्धा परीक्षांकडे फक्त एमपीएससी यूपीएससी आहे असं समजून चालतो आणि हजारो लाखो विद्यार्थी फक्त या दोनच परीक्षांची तयारी करण्यात वेळ वाया घालवतात. त्याचा यशस्वी होण्याचा जो गुणोत्तर आहे ते अतिशय कमी होते आणि हे गुणोत्तर कमी झाले की  आपण ओरडतो आणि ही जी काही नाराजी असते  ते पाहून अनेक गुणवंत लोक त्याकडे वळत नाहीत म्हणजे हे एक **दुष्टचक्र** आहे . हे तुम्ही समजून घेतलं पाहिजे स्पर्धा परीक्षांमध्ये खूप साऱ्या स्पर्धा परीक्षा आहेत माझा तुम्हाला एवढेच सांगण्याचा उद्देश आहे.

हा आपला पहिला मुद्दा होता मला असं म्हणायचं नाही की तुम्ही युपीएससी-एमपीएससी सोडून फक्त ह्याच परीक्षा द्या परंतु युपीएससी-एमपीएससी च्या सोबत आपण या परीक्षांची सुद्धा माहिती घेतली पाहिजे. बऱ्याच जणांना वाटेल की या परीक्षांची तयारी करताना आपल्याला एमपीएससी यूपीएससी ची एकसाथ तयारी कशी करता येईल त्यावरही आपल्याला स्वतंत्र बोलता येईल आपण एखाद्या दुसऱ्या लेखात याविषयी नक्कीच बोलू.

**<u>दुसरा मुद्दा</u>**

मी जो तुम्हाला बोललो होतो की  स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत असलेले गैरसमज काढायला पाहिजे .कुठले कुठले गैरसमज आहेत ते ? त्यातला सगळ्यात मोठा गैरसमज हा आहे हे की **स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्याचे जे गुणोत्तर ते खूप कमी आहे .** स्पर्धा परीक्षेला जर तुम्ही एमपीएससी यूपीएससी  पूरत पकडून ठेवलं तर तुमचं यशस्वी होण्याचं गुणोत्तर खूप कमी आहे हे कबूल .  मी तुम्हाला पहिल्याच मुद्द्यांमध्ये

सांगितलं आहे की फक्त एमपीएससी यूपीएससी म्हणजेच स्पर्धा परीक्षा नाही . स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्याचे गुणोत्तर कमी आहे , तुम्ही दहा परीक्षांपैकी दोनच परीक्षांचा विचार करून असं म्हणताय मग तसं कसं होईल ? माझ्या दहा-बारा वर्षांच्या अनुभवानंतर ठाम मत आहे स्पर्धा परीक्षेमध्ये उत्तम नियोजन चांगली तयारी सर्वसामान्य सुशिक्षित व्यक्तीला जी बुद्धिमत्ता असते ती बुद्धिमत्ता तुमच्याकडे जर असेल तर तुम्ही शंभर टक्के यशस्वी होऊ शकतात .दुसरा गैरसमज हा आहे की स्पर्धापरीक्षांमध्ये खूप अभ्यास करावा लागतो . अनेक लोकांना असं वाटतं की खूप हुशार असावा लागतो खूप बुद्धिमान लोकांचं हे काम आहे हे पण सोडून द्या मी स्वतः एमपीएससीद्वारे अधिकारी झालेलो आहे **<u>वित्त आणि लेखा अधिकारी</u>** म्हणून महाराष्ट्र सरकार मध्ये कार्यरत आहे . कुठलीही स्पर्धा परीक्षा देण्यासाठी खूप बुद्धिमत्ता असावी लागते हा तर्क शुद्ध गैरसमज आहे . उत्तम नियोजन आणि सुव्यवस्थितपणे केलेली तयारी सर्वसामान्य बुद्धिमत्ता असलेल्या व्यक्तीला सुद्धा अधिकारी बनवते हे अगदी. मी अभ्यासात कधीही पहिल्या नंबरवर नव्हतो . 35 टक्के 45 टक्के किंवा 50 टक्के मिळवणारे पण भरपूर जण आहेत .मला असं म्हणायचं की पंचेचाळीस ते 70: च्या दरम्यान असणारे लोकं यामध्ये जास्त यशस्वी झालेले आहेत , मार्क वर काहीही अवलंबून नाही खूप बुद्धिमत्तेची गरज स्पर्धा परीक्षेला लागते हासुद्धा गैरसमज आहे उत्तम नियोजन असेल तर तुम्ही यात नक्कीच यशस्वी होऊ शकाल.

तिसरा मुद्दा ,

**<u>लास्ट बट नॉट लिस्ट</u>** . तो खूप महत्वाचा आहे . **मी स्पर्धा परीक्षा तयारी करतोय म्हणजे खूप मोठे काही करतोय हा गैरसमज** काढून टाका . आजची वास्तविकता ही आहे की स्पर्धा परीक्षांच्या सोबत तुम्ही इतर काय काय करू शकता याचा विचार केला पाहिजे . ते तुमच्या आत्ताच्याच करियरसाठी उपयोगी आहे असं नाही .तर करियर सोबतच तुम्हाला जीवनातील इतरही अनेक गोष्टींसाठी उपयोगी आहे. म्हणजे आयुष्यभरासाठी ते कामाचे ठरेल .

केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाचा **<u>कौशल्य विकासावर</u>** खूप भर आहे त्यात खूप सारे वेगवेगळे प्रकार आहेत . तुम्हाला झेपेल किंवा तुमच्या परीक्षेच्या तयारीत कुठलीही बाधा येणार नाही असे कुठलेही एक किंवा दोन स्कील प्रकार यात निवडा. त्या कौशल्यासाठी प्रशिक्षण घ्या . अभ्यासासोबत योग्य वेळ देऊन थोडे थोडे पैसे मिळवणे सुरु करा, स्वतःकडून अवास्तव अपेक्षा करणं सोडून द्या . आणि जमिनीवर राहून विचार करा “माझं स्वप्न **आयएएस** च आहे. पण मी आज नळ फिटींग करूनही दोन पैसे कमवत आहे” **ही क्षमता आपल्यात असली पाहिजे** “माझे स्वप्न डेप्युटी कलेक्टर व्हायचं आहे त्यासाठी सुद्धा मी मेहनत घेतो आहे . पण आज माझ्या भोवतालची जी काही परिस्थिती आहे ती ओळखून कोणाचा मोबाईल दुरुस्त करणे किंवा टीव्ही दुरुस्त करण्याचे काम करून दिवसाला तीनशे रुपये किंवा चारशे रुपये मिळवतो

आहे". याला खूप वाव आहे हा मुद्दा खूप सविस्तरपणे सांगता येईल याकडे तुम्ही सगळे जण गांभीर्याने पहावे ही माझी विनंती आहे **स्किल डेव्हलपमेंट या कार्यक्रमाकडे वळा . स्पर्धा परीक्षा करत करत वळा स्पर्धा परिक्षा आणि स्किल डेव्हलमेंट च्या शासनाच्या प्रचंड योजना आहेत . यात केंद्र शासनाच्या आहेत आणि राज्य शासनाच्या सुद्धा आहेत वेगवेगळ्या समाजघटकांसाठी सुद्धा आहेत आणि ओपन च्या विद्यार्थ्यांसाठी सुद्धा आहेत लाखो करोडो रुपये शासन यासाठी खर्च करत .** पण लाखो विद्यार्थ्यांपर्यंत या योजना पोहोचत नाहीत , हे मी तुम्हाला अधिकारवाणीने सांगतो शासनामध्ये मी स्वतः कार्यरत आहे माझी संस्था शासनासोबत मागच्या पाच वर्षापासून कार्यरत आहेत या सगळ्या योजना अजूनही **स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ ऍडमिनिस्ट्रेटिव्ह करिअर** मुंबई, (**एसआयएससी)** यूपीएससीच्या परीक्षांसाठी तयारी करून घेते त्यासाठी सगळ व्यवस्था पुरवतं मार्गदर्शन पुरवतं.. "**यशदा त्यासोबतच बार्टी आणि सारथी , महाज्योती , अमृत या संस्था शासनाने खास याच उद्देशासाठी बनवलेल्या आहेत .**. त्यांची माहिती आपण घेतली पाहिजे . हे झालं स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत.

शासनाच्या स्किल डेव्हलपमेंट च्या पण खूप साऱ्या योजना आहेत. यामध्ये शासन तुम्हाला शिकण्याची संधी उपलब्ध करून देत आहे आणि सोबतच पैसे सुद्धा देत आहे ही किती मोठी संधी आहे आणि आपण याचा गांभीर्याने विचार करत नाही .

विद्यार्थी मित्रांनो शब्दमर्यादा , वेळेची मर्यादा हे सगळं पाहता खूप संक्षेपाने मी माझे मुद्दे मांडले आहेत . मला असं वाटतं की तुम्ही हया सगळ्या गोष्टींचा सविस्तरपणे विचार केला पाहिजे . याबाबतीत तुम्हाला विस्तृतपणे जी काही माहिती लागेल त्यासाठी **मी व्यक्तिशः आणि माझी संस्था** तत्पर आहे यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे .

**धन्यवाद**